महाराष्ट्र शासन

**ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन, मुंबई-४०० ००१**

दुरध्वनी क्र.:-(०२२)२२६६४६३८/२२६७१३३३

website :- www.dol.maharashtra.gov.in E-Mail :- director.dol@maharashtra.gov.in

जा. क्र. ३४/संकेतस्थळ/२०२३-२४/ ६८४५ दिनांक :- २३.०१.२०२४

दर मागणी पत्र

**ग्रंथालय संचालनालयाच्या dol.maharashtra.gov.in या संकेतस्थळाच्या देखभाल करार व दुरुस्ती करिता दरपत्रक पाठविणेबाबत.**

ग्रंथालय संचालनलयाचे सध्या कार्यरत असलेले संकेतस्थळ (dol.maharashtra.gov.in) अद्यावत करणे (including security audit) तसेच ३ वर्षाकरिता देखभाल व दुरुस्ती करार करण्याकरिता इच्छुक पुरवठादारांकडून दरपत्रक मागविण्यात येत आहे. सदर दरपत्रक पाठविताना खालील अटी व शर्तीचे पालन करावे.

**दरपत्रक पाठविण्यासाठी अटी व शर्ती खालीलप्रमाणे :-**

१) दरपत्रक सादर करण्याची पध्दत :- दरपत्रक एक लिफाफा पध्दतीने सादर करावा.
दरपत्रक धारकाने लिफाफ्यामध्ये अधिकृत वितरक असल्याबाबतचे प्रमाणपत्र, वैध जीएसटी नोंदणी प्रमाणपत्राची प्रत, पॅनकार्ड, आधार कार्ड स्वसाक्षांकित प्रत, विहित नमुन्यात (परिशिष्ट-१) दर GST सह नमुद करावेत तसेच स्वाक्षरी करून लिफाफा सीलबंद करावा.

२) लिफाफा सीलबंद करून लिफाफ्यावर **"ग्रंथालय संचालनालय या विभागासाठी वेबसाईट देखभाल करण्याबाबत करीता दरपत्रक"** असे ठळकपणे नमुद करावे. तसेच सदर लिफाफा मा. ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन, शहिद भगत सिंग रोड, फोर्ट,मुंबई - ४०० ००१ यांना अग्रेषित करावा.

३) लिफाफ्यावर दरपत्रक सादर करणाऱ्या अधिकृत वितरकाचे नाव, पत्ता, ई-मेल व संपर्कासाठी दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक लिहावा.

४) संकेतस्थळ देखभाल करार व दुरुस्तीचा शासकीय कार्यालयाचा अनुभव असणे बंधनकारक असून त्यासाठीचे पुरावे सोबत जोडणे.

५) दरपत्रके उघडल्यानंतर सर्वात कमी दर नमुद केलेले दरपत्रक स्वीकृत केले जाईल.

६) सशर्त दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

७) कर देयक (TAX INVOICE) दोन प्रतीत मा. ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, मुंबई यांचे नावे देणे आवश्यक राहील.

८) दरामध्ये तसेच दरपत्रक कागदपत्रात कोठेही खाडाखोड, Overwriting पांढरी शाई लावलेले दरपत्रक स्विकारले जाणार नाही.

९) कोणतेही कारण न देता दरपत्रक स्वीकृत करणे अथवा प्रक्रिया स्थगित करण्याचा अधिकार ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी राखून ठेवला आहे.

१०) सदर दरपत्रकाच्या अटी व शर्ती शिथील करण्यास ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य सक्षम आहेत.

११) पुरवठादारांनी दरपत्रक दिनांक २४.०१.२०२४ ते दि. ३१.०१.२०२४ पर्यंत संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत संचालनालयास प्राप्त होतील अशा रितीने प्रत्यक्ष हस्तदेय अथवा नोंदस्विकृत डाकनोंद पोस्टाने पाठवावे.

(अशोक मा. गाडेकर)
प्र. ग्रंथालय संचालक